**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव आणि राज ठाकरे यांच्याकडून युतीची घोषणा
- रिझर्व्ह बँक आगामी काही आठवड्यांमध्ये दोन लाख कोटी रुपयाचे सरकारी रोखे खरेदी करणार
- इसरोकडून अमेरिकन दळणवळण उपग्रह ब्लु बर्ड ब्लॉक २ चं यशस्वी प्रक्षेपण
- एच वन बी व्हिजासाठी लॉटरी व्यवस्था बंद, उच्चशिक्षित आणि जास्त पगार मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य मिळणार

**आणि**

- लिबियाचे लष्करप्रमुख मोहम्मद अली अहमद अल हद्दाद यांच्यासह आठ जणांचा विमान अपघातात मृत्यू

**<><><><><>**

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी एकत्र येत असल्याची घोषणा आज मुंबईत वार्ताहर परिषद घेऊन उद्धव आणि राज ठाकरे यांनी केली. याविषयी राज ठाकरे म्हणाले....

**होल्ड राज ठाकरे १**

मुंबईचा पुढचा महापौर मराठीच असेल आणि आमचाच असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पण जागा वाटप आणि अन्य माहिती देणं टाळलं.

**होल्ड राज ठाकरे २**

नाशिक महापालिकेसाठी युती झाली असून उर्वरित महापालिकांच्या संदर्भात एक-दोन दिवसांत शिक्कामोर्तब होईल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. मराठी माणूस आणि मुंबईच्या रक्षणासाठी ही युती झाल्याचं त्यांनी सांगितलं.

## होल्ड उद्धव ठाकरे ३

महाविकास आघाडी कायम असली तरी महापालिका निवडणुकांसाठी आमच्या दोन्ही पक्षांची युती झाली आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. काँग्रेसनं मुंबई महापालिकेच्या निवडणुका स्वतंत्र लढवण्याची घोषणा केली असून शरद पवारांच्यासोबत वाटाघाटी सुरू असल्याची माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

**<><><><><>**

नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीत थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना संबंधित सभागृहाचं सदस्यत्व देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यांना मतदानाचा अधिकार दिला जाणार आहे. यासंदर्भातला अध्यादेश काढायला राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. जिल्हा कर्मयोगी योजनेचा दुसरा टप्पा आणि सरपंच संवाद कार्यक्रमही राज्य सरकार राबवणार आहे. तसंच जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या आरोग्य सेविकांना नियमित करण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे. धाराशिव शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाची एक एकर जागा द्यायला मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली.

**<><><><><>**

विकसित भारत जीरामजी योजनेत केंद्राचा वाटा ९५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी वृत्तपत्रातल्या लेखात दिली. यातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन देण्याची सरकारची वचनबद्धता दिसून येते, असं प्रतिपादन त्यांनी केलं. मनरेगासाठी केंद्राचा वाटा ८६ हजार कोटी रुपये इतकाच असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं बँकिंग प्रणालीमध्ये तरलता वाढावी, यादृष्टीनं नवीन उपायांची घोषणा केली आहे. पुढच्या काही आठवड्यांमध्ये खुल्या बाजार परिचालनाच्या आधारे दोन लाख कोटी मूल्याचे सरकारी रोखे खरेदी केले जातील. तसंच १० अब्ज डॉलर मूल्याची डॉलर- रुपया खरेदी- विक्री स्वॅप केली जाणार आहे. या व्यवहारांमधून सुमारे ३ लाख कोटी रुपये उपलब्ध करून देण्याची रिझर्व बँकेची योजना आहे. रिझर्व्ह बँकेनं डिसेम्बर महिन्यात आतापर्यंत रोखे खरेदी आणि परकीय चलन देवाणघेवाणीच्या माध्यमातून सुमारे १ लाख ४५ हजार कोटी रुपयांची रोकड उपलब्ध करून दिली आहे.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इसरो ने आज अमेरिकन दळणवळण उपग्रह ब्लु बर्ड ब्लॉक २ चं यशस्वी प्रक्षेपण केलं. आंध्र प्रदेशच्या श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ स्थानकावरून भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी ८ वाजून ५५ मिनिटांनी त्याचं प्रक्षेपण करण्यात आलं.

अमेरिकी ब्ल्यूबर्ड उपग्रह हा भारतीय अंतराळयानाने प्रक्षेपित केलेला आजवरचा सर्वात जड उपग्रह असून हे प्रक्षेपण अतिशय अचूकतेने झाल्याबद्दल इसरो चे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सर्व सहभागी तंत्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात इसरो चं अभिनंदन केलं आहे. भारताची जड उपग्रह प्रक्षेपीत करण्याची क्षमता या प्रक्षेपणाद्वारे जगासमोर आली असून भारत आता व्यावसायिक प्रक्षेपणक्षेत्रातही आघाडी घेत असल्याबद्दल त्यांनी इसरो ची प्रशंसा केली आहे.
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही इसरो च्या सर्व वैज्ञानिक आणि तंत्रज्ञांचं अभिनंदन केलं असून या प्रक्षेपणातून आत्मनिर्भर भारतासाठी आपले प्रयत्न दिसून येतात असं समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ लेखक विनोद कुमार शुक्ल यांच्या पार्थिवावर आज रायपूरमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. त्यापूर्वी छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी त्यांचं अंत्यदर्शन घेतलं.  उपचारादरम्यान काल त्यांचं निधन झालं होतं. ते ८८ वर्षांचे होते.

**<><><><><>**

गोव्यामधल्या नाईटक्लबमध्ये लागलेल्या आगीप्रकरणी अटक असलेल्या दोन व्यवस्थापकांना गोवा न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती डी व्ही पाटकर यांनी दोन्ही व्यवस्थापकांना सशर्त जामीन मंजूर केला. तर विवेक सिंग यांचा जामीन फेटाळून लावला. सात डिसेंबरला या तिघांना अटक झाली होती. जामीन मंजूर झालेल्या दोन्ही व्यवस्थापकांनी न्यायालयाच्या परवानगीशिवाय देशाबाहेर जाऊ नये असं न्यायमूर्तींनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या एच वन बी व्हिजा साठीच्या निवड प्रक्रियेत अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने मोठे बदल केले आहेत.  त्यानुसार यापुढे एच वन बी व्हिजा साठी लॉटरी व्यवस्था बंद करून त्याऐवजी अधिक उच्चशिक्षित आणि जास्त पगार मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिलं जाणार आहे. यामुळे अमेरिकन कर्मचाऱ्यांना अधिक चांगलं वेतन आणि रोजगाराच्या संधी मिळू शकतील, असं अमेरिकेच्या अंतर्गत सुरक्षा विभागाने म्हटलं आहे. आजवर या व्हिजा साठीच्या लॉटरी व्यवस्थेचा गैरवापर अमेरिकन कंपन्यांनी फक्त कमी पगारावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांना अमेरिकेत आणण्यासाठी केला होता, आता नव्या व्यवस्थेतून अधिक उच्चशिक्षित कर्मचाऱ्यांना अमेरिकेत आणण्यासाठी अमेरिकन कंपन्यांना प्रोत्साहन देण्याचं

काँग्रेसचं उद्दिष्ट पूर्ण होईल, असं अमेरिकन नागरिकत्व सेवेचे प्रवक्ते मॅथ्यू ट्रेगेसर यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

लिबियाचे लष्करप्रमुख मोहम्मद अली अहमद अल हद्दाद आणि चार जणांचा तुर्किएची राजधानी अंकारा इथं काल विमान अपघातात मृत्यू झाला. ते तुर्किएवरून लिबियाला परतत असताना हा अपघात झाला. ही दुखद घटना असल्याचं लिबियाचे प्रधानमंत्री अब्दुल हमिद दबेबाह यांनी म्हटलं आहे.  लष्करी अधिकारी अल फितौरी गरिबील, मोहम्मद अल कतारी, हद्दाद यांचे सल्लागार मोहम्मद अल अस्वी दियाब आणि लष्करी छायाचित्रकार मुहम्मद ओमर अहमद महजौब यांचा मृतांमधे समावेश आहे. याशिवाय विमानातल्या तीन कर्मचाऱ्यांचाही यात मृत्यू झाल्याचं तुर्किएनं म्हटलं आहे. विमानात तांत्रिक बिघाड झाल्यानं हा अपघात झाल्याचं सांगितलं जात आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमधील नोआखाली जिल्ह्यातल्या जमिनीवर ताबा मिळवण्यासाठी दोन गटात काल झालेल्या हिंसाचारात पाच जणांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी झाले. मेघना नदीकाठावर गाळामुळे तयार झालेल्या जमिनीवर ताबा मिळवण्यासाठी हा हिंसाचार झाला. यात दोन्ही गटांच्या म्होरक्यांचा मृत्यू झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन  मृतदेह ताब्यात घेतले आणि हिंसाचार थांबवला.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटना परिषदेवर भारताची पुन्हा एकदा बहुमतानं निवड झाली आहे, अशी माहिती केंद्रिय नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी दिली आहे.

**<><><><><>**

मुंबई महापालिकेची निवडणुक वंचित बहुजन आघाडीसोबत लढवण्याचा निर्णय झाल्याचं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज जाहीर केलं. दोन्ही पक्षात जागा वाटपाच्या संदर्भात स्थानिक परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल. पण कुठेही निम्म्या - निम्म्या जागा वाटपाची मागणी झाली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

//<><><><><>//